आर बी आय/ २००६-२००७/२१४
डीबीओडी. क्र. एल ई जी. बीसी . ४९/०९.०७.००५/२००६-०७

डिसेंबर १८, २००६

प्रति,
सर्व अनूसुचित व्यापारी बँका
(आर आर बी सोडून)

**चेक टाकण्यासाठी पेटीची सुविधा व चेकच्या पावतीसाठी सुविधा**

कृपया आमचे परिपत्रक डीबीओडी, क्र. एईजी. बीसी. ७४/०९.०७.००५/२००३-२००४
दिनांक एप्रिल १०, २००४ चा संदर्भ घ्यावा. त्यात सर्व बँकांना सुचित करण्यात आले होते की, चेक्स टाकण्यासाठी पेटी आणि चेक गोळा करण्यासाठी असलेल्या नियमित काउंटर्सवर चेकची पोच देण्याची सुविधा अशा दोन्हीही गोष्टी ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि ग्राहकाने काउंटर्सवर चेक दिल्यास त्याची पोच देणे कोणत्याही शाखेने नाकारु नये.
२. भारतीय रिझर्व बँक / बँक व्यवहार लोकपाल यांचेकडे तक्रारी येत आहेत की, बऱ्याचदा बँक शाखा काऊंटरवर चेकचा स्वीकार न करता, ते चेक्स टाकण्यासाठी असलेल्या पेटीत टाकण्यास ग्राहकांना भाग पाडत आहेत. तरी बँकांना सूचित करण्यात येत आहे त्यांनी वरील परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. आणि तसेच ग्राहकांना चेक-पेटीत चेक्स टाकण्यास भाग पाडले जात नाही याची खातरजमा करावी.

३. जेथे-जेथे म्हणून चेक्स टाकण्याची पेटी आली आहे तेथे-तेथे, ग्राहकांना त्यांना उपलब्ध असलेल्या दोन्हीही पर्यायांची, म्हणजे - चेक्स पेटीत टाकणे किंवा काऊंटर्सवर जमा करणे - जाणीव करून देण्यात यावी व त्यामुळे ते जाणीवपूर्वक योग्य तो निर्णय स्वतःच घेऊ शकतील. **यासाठी बँकांना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी न चुकता चेक्स जमा पेटीवरच पुढीलप्रमाणे संदेश प्रदर्शित करावा.**

**"ग्राहक त्यांचे चेक्स काऊंटरवरही जमा करू शकतात व त्यांची पोच पे-इन- स्लिपवर घेऊ शकतात"**

वरील संदेश, इंग्रजी, हिंदी आणि त्या राज्याच्या प्रादेशिक भाषेत प्रदर्शित करावा.

४. कृपया याची पोच द्यावी.

आपला विश्वासू

(प्रशांत सरन)
प्रभारी- प्रमुख महा व्यवस्थापक